
## श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत

# हरिपाठ

### श्री संत शंकर महाराज आश्रम,
### पिंपळखुटा आश्रमाच्या परंपरे प्रमाणे



श्री संत शंकरबाबा महाराज
श्री क्षेत्र पिंपळखुटा

श्री संत शंकर महाराज आश्रम व विश्वमंदिर भक्तिधाम
श्रीक्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती (महा.)

श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत

# हरिपाठ

प्रकाशक : श्री संत शंकर महाराज आश्रम श्री क्षेत्र पिंपळखुटा
७९ वा प्रकटदिन महोत्सव समिती, २०२३

आवृत्ती : प्रथम

तिथी : निज भाद्रपद शु. ३ ।। हरितालीका तृतीया, शके १९४५
स्वर्णगौरी व्रत, दि. १८ सप्टेंबर २०२३श्री संत शंकरबाबा
महाराजांचा ७९ वा प्रकटदिन महोत्सव २०२३

प्रति : २०००

मुद्रक : अमेय ग्राफीक्स, अमरावती. मो. ९२२६५९७५८४

सेवामूल्य : रु. १०/-

पुस्तक मिळण्याचे ठिकाण : श्री संत शंकर महाराज आश्रम, पिंपळखुटा.

# ।। मनोगत ।।

श्री संत शंकरबाबा महाराजांनी त्यांच्या आश्रामामध्ये सन २०२२ पासून एक नविन प्रथा सुरु केली आहे. सकाळी प्रभात भजन आणि संध्याकाळी भजन संध्या सुरु केली! अर्थात संध्याकाळी त्यांच्या उपस्थितीत हरिपाठ सुरु केला आहे.

श्री संत ज्ञानेश्वर माऊलीचा हरिपाठ आश्रमात नविन नव्हता. नियमितपणे सकाळचे ध्यान, ध्यानावर चिंतन, संध्याकाळी प्रार्थना व प्रार्थनेवर चिंतन होत असे, त्यानंतर श्री संत शंकर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विध्यार्थी हरिपाठाचे गायन करीत असत. परंतु हा सर्व परिपाठ पारायण कक्षात होत असे.

सन २०२२ पासून हरिपाठाचे गायन श्री संत शंकरबाबा महाराजांच्या दर्शन कक्षामध्ये त्यांच्या उपस्थितीत सुरु झाले. श्री संत शंकर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आणि श्री संत शंकर महाराज वसतीगृहाचे विद्यार्थी यांनी संयुक्तपणे हरिपाठाचे गायन सुरु केले. हरिपाठात पुणे, अमरावती, नागपूर, वर्धा, भंडारा वगैरे ठिकाणावरुन येणारे भक्तगण सुध्दा सहभागी होऊ लागले होते.

ह्या हरिपाठात आश्रम परिसरातील ११-१२ वर्षाचे विद्यार्थी सुध्दा सहभागी होऊ लागले होते. मात्र त्यांच्या हरिपाठ गायनात अज्ञानवश आणि अनावधानाने काही चुका राहत होत्या.

पुण्यावरुन येणारे आणि हरिपाठात सहभागी होणारे भक्त

ह.भ.प. श्री. संतोषभाऊ पोकळे ह्यांनी विद्यार्थ्यांचा हा दोष सर्वप्रथम माझ्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर ह.भ.प. श्री. बाळासाहेब वाल्हेकर यांनी सुध्दा हा दोष कसा दूर करता येईल याबाबत माझ्या सोबत चर्चा केली.

तेव्हा ह.भ.प.श्री. पोकळे, ह.भ.प.श्री. वाल्हेकर आणि मी स्वत: या तिघांनी या दोषावर विचार विनिमय करुन हा दोष दूर करण्यासाठी 'विद्यार्थ्यांच्या खिशात बसेल एवढ्या आकाराची हरिपाठाची प्रत छापावी व विद्यार्थ्यांना विनामूल्य द्यावी असे ठरले.

ह्या प्रकाशनाची परवानगी घेण्यासाठी मी जेव्हा श्री संत शंकरबाबा महाराजांकडे गेलो तेव्हा त्यांनी एक खंत माझ्या समोर प्रकट केली. ते म्हणाले, ''मोहोड सर, आम्ही लहानपणा पासून ह्या

हरिपाठाचे गायन करीत असू. गावातील त्याकाळातील वयोवृध्द मंडळी सुध्दा आमच्या सोबत हरिपाठ गायनात सहभागी होत असत. तेव्हा आपली हरिपाठाची परंपरा वेगळी होती. हरिपाठाच्या सुरुवातीला आम्ही सातही दिवस सात वाराचे अभंग म्हणत होतो. त्यानंतर हरिपाठ होत असे, त्यानंतर गुरु परंपरेचे अभंग म्हणत होतो. त्यानंतर विनंतीचे अभंग म्हणत असू आणि आरती झाल्यावर नाटाचे अभंग म्हणत असू.''

''परंतु आता ही परंपरा बंद पडली आहे. विद्यार्थी आणि नविन भक्तांना नाटाचे अभंग पाठ नाहीत, त्यामुळे नाटाचे अभंग म्हटल्या जात नाहीत. आपल्या जुन्या परंपरेप्रमाणे जर हरिपाठाचे नविन पुस्तक प्रकाशित केले तर आपली जुनी परंपरा पुन्हा सुरु करता

येईल! फार छान होइल! हे एवढे तुम्ही कराच! तुम्हाला आमचे आशीर्वाद आहेत.''

श्री रामनवमी महोत्सवाचे निमित्ताने पुण्या वरुन श्री. सुशांत मोहोड आश्रमात आले होते. त्यांना ही कल्पना आवडली. त्यांनी आर्थिक भार उचलला आणि अशा प्रकारे हरिपाठाची ही आवृत्ती आकारास आली.

श्री. नंदकिशोर महाराज हलमारे, श्री. नंदकिशोर महाराज चिकटे, श्री. वैभव महाराज घावट आणि कुणाल महाराज मडामे या सर्वांच्या प्रयत्नातून श्री संत शंकर महाराज आश्रमाच्या परंपरेप्रमाणे हा हरिपाठ छापून प्रकाशित होत आहे. हा सुधारित स्वरुपातील

हरिपाठ आपल्या सर्वांच्या हाती देतांना मला अत्यंत आनंद होत आहे.

ह्या छोटेखानी परंतु सुधारित स्वरुपातील हरिपाठाच्या पुस्तकाच्या कल्पनेचे आपण सर्वांनी स्वागत केले आहे हे पाहून मला कृतार्थ झाल्यासारखे वाटत आहे.

आपल्या सर्वांचा स्नेहांकित,
भास्कर मोहोड
अमरावती

निज भाद्रपद शु. ३ ।।
हरितालीका तृतीया,
शके १९४५ स्वर्णगौरी व्रत,
दि. १८ सप्टेंबर २०२३
श्री संत शंकरबाबांचा ७९ वा प्रकटदिन महोत्सव २०२३


## ✱ अनुक्रमणिका ✱


| | |
|---|---|
| राज्यभिषेक मंत्र | १ |
| सोमवारचा अभंग | १ |
| मंगळवारचा अभंग | २ |
| बुधवारचा अभंग | ३ |
| गुरुवारचा अभंग | ३ |
| शुक्रवारचा अभंग | ५ |
| शनिवारचा अभंग | ६ |
| रविवारचा अभंग | ६ |
| हरिपाठ (अलंकापुरी, मंगलाचरण, ध्यानाचा अभंग) | ८ |

| | | |
|---|---|---|
| अ) | श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत<br>हरिपाठाचे अभंग (क्र.१ ते २८) | ११ |
| ब) | गुरुपरंपरेचे अभंग | ४४ |
| क) | विनवणीचे अभंग | ५४ |
| ड) | आरती (हरिपाठ संपल्यानंतर) | ५८ |
| | १) आरती : भगवान पांडुरंगाची | ५८ |
| | २) आरती : श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची | ६१ |
| | ३) आरती : श्री संत तुकाराम महाराजांची | ६२ |
| | ४) आरती : श्री एकनाथ महाराजांची | ६३ |
| | ५) धुप आरती | ६४ |

६) आरती : श्री समर्थ लहानुजी महाराजांची ६६
७) आरती : श्री संत सत्यदेव बाबांची ६८
८) आरती : श्री संत शंकरबाबा महाराजांची ७०
उपसंहार (नाट) विभाग ७२
४) मागणे : ७४
५) प्रसाद ७६
क) पसायदान ७८
जयघोष ८२
नाट विभाग ८४ ते ९१
सोमवारचा नाटाचा अभंग ८४

मंगळवारचा नाटाचा अभंग ८५
बुधवारचा नाटाचा अभंग ८७
गुरुवारचा नाटाचा अभंग ८८
शुक्रवारचा नाटाचा अभंग ९०
शनिवारचा नाटाचा अभंग ९०
रविवारचा नाटाचा अभंग ९१
क्षीरापतीचे अभंग ९३



## राज्याभिषेक मंत्र

**ॐ अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव**
**वयुनानि विद्वान् ।**
**युयोध्यस्मज्जुहुराणमेनो । भुयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ।।**

## सोमवारचा अभंग

भजन करी महादेव । राम पूजी सदाशिव ।।१।।
दोघें देव एक पाहीं । तयां ऐक्य दुजे नाहीं ।।२।।
शिवा-रामा नाहीं भेद । ऐसे देव तेहि सिद्ध ।।३।।
जनी म्हणे आत्मा एक । सर्वा घटीं तो व्यापक ।।४।।

## मंगळवारचा अभंग

रंगा येई वो ये, रंगा येई वो ये ।
विठाई - किठाई माझे कृष्णाई कान्हाई ।।१।।

वैकुंठवासिनी वो, जगत्रयजननी वो ।
तुझा वेधु माझे मनी वो ।।२।।

कटीं कर विराजित । मुकुटरत्नजडित ।
पीतांबरु कसिला। तैसा येई कां धांवत ।।३।।

विश्वरुप विश्वंभरें । कमळनयनें कमळाकरें वो ।
तुझें ध्यान लागो बापरखुमादेविवरे वो ।।४।।

## बुधवारचा अभंग

बोलावा विठ्ठल,पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव ।।१।।
येणें सोसें मन झाले हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ।।२।।
बंधनापासोनि उकलली गांठी। देतां आली मिठी सावकाश ।।३ ।।
तुका म्हणे देह भरिला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ।।४।।

## गुरुवारचा अभंग

उभारिला ध्वज तिहीं लोकांवरी ।
ऐसी चराचरी कीर्ति ज्यांची ।।१।।

तें हें निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपान ।
मुक्ताबाई ज्ञानदीप्तिकळा ।।२।।

धरुनि सगुण रूपें, केली बाळक्रीडा ।
बोलविला रेडा निगम वाचें ।।३।।

बैसूनियां वरी चालविली भिंती ।
चांगदेवा प्रति दिली भेटी ।।४।।

मग वास केला अलंकापुरासीं ।
पिंपळ द्वारासीं कनकाचा ।।५।।

निळा म्हणे ज्यांच्या नामें करिता घोष ।
नातळती दोष कळिकाळाचे ।।६।।

# शुक्रवारचा अभंग

स्वर्ग, मृत्यू, पाताळ त्याचा मंडप घातिला वो ।
चारी वेदांचा फुलवरा बांधिला वो ।
शास्त्रे, पुराणें अनुवादती तुझा गोंधळ मांडिला वो ।।१।।

उदो बोला, उदो बोला कृष्णाबाई माउलीचा वो ।।धृ।।
जीवशिव संबळ घेऊनि आनंदे नाचती वो ।
अठ्यांऐशी सहस्त्र ऋषी दिवटे तिष्ठती वो ।
तेहतीस कोटि देव चामुंडा उदो उदो म्हणती वो ।।२।।

आषाढी कार्तिकी तुझ्या गोंधळाची दाटी वो ।
पुंडलिक दिवटा शोभे वाळवंटी वो ।
एका जनार्दनी अंबा उभी कर ठेऊनि कटीं वो ।।३।।

## शनिवारचा अभंग

हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ।।१।।
तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ।।२।।
करोनी उड्डाण । केलें लंकेचें शोधन ।।३।।
जाळियली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ।।४।।

## रविवारचा अभंग

खेळ मांडियेला वाळवंटीं घाई । नाचती वैष्णव भाई रे ।
क्रोध,अभिमान केला पावटणी। एक एका लागतील पायीं रे ।।१।।
नाचती आनंदकल्लोळीं । पवित्र गाणें नामावळी रे ।
कळिकाळावरी घातली कास । एक एकाहूनि बळी रे ।।२।।

गोपीचंदन उटी तुळसीच्या माळा। हार मिरवती गळां रे ।
टाळ, मृंदंग घाई पुष्पांचा वरुषाव । अनुपम्य सुखसोहळा रे ।।३।।

लुब्धलीं नादीं लागली समाधि । मूढ जन नर नारी लोका रे ।
पंडित,ज्ञानी,योगी:महानुभाव। एकचि सिध्दसाधका रे ।।४।।

वर्णाभिमान विसरली याति । एक एकां लोटांगणीं जाती रे ।
निर्मळ चित्तें झाली नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ।।५।।

होतो जयजयकार गर्जत अंबर। मातले वैष्णव वीर रे ।
तुका म्हणे सोपी केली पायवाट । तरावया भवसागर रे ।।६।।

# हरिपाठ

१) अलंकापुरी पुण्यभूमि पवित्र ।
तेथे नांदतो ज्ञानराज सुपात्र ।।१।।
तया आठविता महा पुण्यराशी ।
नमस्कार माझा श्रीगुरु ज्ञानेश्वराशी ।।२।।

२) गुरु र्ब्रह्मा, गुर्रु विष्णू,
गुरु र्देवो महेश्वरा।
गुरुर्साक्षात परब्रह्म,
तस्मै श्री गुरवे नमः ।।

३) भजन - जय जय रामकृष्ण हरि ।

४) मंगला चरण

रुप पाहता लोचनी। सुख झालें वो साजणी।।१।।
तो हा विठ्ठल बरवा ।तो हा माधव बरवा ।।२।।
बहुता सुकृताचीजोडी।म्हणुनि विठ्ठलींआवडी।।३।।
सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेविवर ।।४।।

भजन - ।। जय जय रामकृष्ण हरी ।।

### ५) ध्यानाचा अभंग -

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ।।१।।
तुळसीहार गळां कांसे पीतांबर ।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।२।।
मकर कुंडलें तळपती श्रवणीं ।
कंठी कौस्तुभमणि विराजित ।।३।।
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीनें ।।४।।

## अ) श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठाचे अभंग (क्र.१ ते २८)

१ - देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं ।
तेणें मुक्ति चारी साधियेल्या ।।१।।
हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा ।
पुण्याची गणना कोण करी ।।२।।
असोनि संसारी जिव्हे वेगु करीं ।
वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।३।।
ज्ञानदेव म्हणें व्यासाचियें खुणा ।
द्वारकेचा राणा पांडवां घरीं ।।४।।

२- चहूं वेदीं जाण साही शास्त्रीं कारण ।
अठराही पुराणें हरिसी गाती ।।१।।

मंथुनी नवनीता तैसें घे अनंता ।
वाया व्यर्थ कथा सांडी मार्गु ।।२।।

एक हरि आत्मा जीवाशिवसमा ।
वायां तूं दूर्गमा न घालीं मन ।।३।।

ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ ।
भरला घनदाट हरि दिसे ।।४।।

३- त्रिगुण असार निर्गुण हें सार ।
सारा-सार विचार हरिपाठ ।।१।।

सगुण-निर्गुण गुणांचें अगुण ।
हरिवीण मन व्यर्थ जाय ।।२।।

अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार ।
जेथोनि चराचर हरिसी भजे ।।३।।

ज्ञानदेवा ध्यानीं, रामकृष्ण मनीं ।
अनंत जन्मोंनी पुण्य होय ।।४।।

४-　भावेंवीण भक्ति, भक्तिवीण मुक्ति ।
बळेवीण शक्ति बोलूं नये ।।१।।

कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत ।
उगा राहे निवांत शिणसी वायां ।।२।।

सायास करिसी प्रपंची दिननिशीं ।
हरीसी न भजसी कवण्या गुणें ।।३।।

ज्ञानदेव म्हणें हरिजप करणें ।
तुटेल धरणें प्रपंचाचें ।।४।।

५- योग-याग विधी येणें नोहे सिध्दि ।
वायाचि उपाधी दंभ धर्म ।।१।।

भावेंवीण देव नकळे निःसंदेह ।
गुरुवीण अनुभव कैसा कळे ।।२।।

तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त ।
गुजेंवीण हित कोण सांगे ।।३।।

ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ।
साधूंचे संगती तरणोपाय ।।४।।

६- साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला ।
ठायींच मुराला अनुभव ॥१॥

कापुराची वाती उजळली ज्योति ।
ठायींच समाप्ती झाली जैसी ॥२॥

मोक्षरेखे आला भाग्यें विनटला ।
साधुचा अंकिला हरिभक्त ॥३॥

ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं ।
हरि दिसे जनीं-वनीं आत्मतत्त्वी ॥४॥

७ - पर्वताप्रमाणें पातक करणें ।
वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥

नाहीं ज्यांसी भक्ति, तो पतित अभक्त ।
हरिसी न भजत दैवहत ॥२॥

अनंत वाचाळ बरळती बरळ ।
त्यां कैसेनि गोपाळ पावे हरि ॥३॥

ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ।
सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

८- संतांचे संगती मनोमार्ग गती ।
आकळावा श्रीपती येणे पंथे ।।१।।

रामकृष्ण वाचा भाव हा जिवाचा ।
आत्मा जो शिवाचा राम जपे ।।२।।

एक तत्व नाम साधिती साधन ।
द्वैताचें बंधन न बाधिजे ।।३।।

नामामृत गोडी वैष्णवा लाधली ।
योगियां साधली जीवनकळा ॥४॥

सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला ।
उद्धवा लाभला कृष्णदाता ॥५॥

ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ ।
सर्वत्र दुर्लभ विरळा जाणें ॥६॥

९- विष्णुवीण जप व्यर्थ त्याचें ज्ञान ।
रामकृष्णीं मन नाही ज्याचें ।।१।।
उपजोनि करंटा नेणों अद्वैत वाटा ।
रामकृष्णीं पैठा कैसेंनी होय ।।२।।
द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान ।
तया कैचें कीर्तन घडेंल नामी ।।३।।
ज्ञानदेव म्हणों सगुण हें ध्यान ।
नामपाठ मौन प्रपंचाचें ।।४।।

**भजन - ।। रामकृष्ण हरी जयजय रामकृष्ण हरि ।।**

१०- त्रिवेणीसंगमी नाना तीर्थें भ्रमी ।
चित्त नाहीं नामी तरी तें व्यर्थ ।।१।।

नामासी विन्मुख तो नर पापिया ।
हरिवीण धांवया न पवे कोणी ।।२।।

पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मिक ।
नामें तिन्हीं लोक उध्दरती ।।३।।

ज्ञानदेव म्हणें नाम जपा हरिचें ।
परंपरा त्याचें कुळ शुद्ध ।।४।।

११- हरि उच्चारणीं अनंत पापराशीं ।
जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥

तृण अग्निमेळें समरस झालें ।
तैसे नामें केलें जपतां हरि ॥२॥

हरि उच्चारण मंत्र हा अगाध ।
पळे भूतबाधा भेणें तेथें ॥३॥

ज्ञानदेव म्हणें हरि माझा समर्थ ।
न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

१२- तीर्थ व्रत नेम भावेवीण सिध्दि ।
वायांचि उपाधि करिसी जना ।।१।।

भावबळें आकळें येऱ्हवीं नाकळे ।
करतळीं आवळे तैसा हरि ।।२।।

पारियाचा रवा घेतां भूमीवरी ।
यत्न परोपरी साधन तैसें ।।३।।

ज्ञानदेव म्हणें निवृत्ति निर्गुण ।
दिधलें संपूर्ण माझ्या हातीं ।।४।।

१३- समाधि हरीची समसुखेंवीण ।
न साधेल जाण द्वैतबुध्दी ।।१।।

बुध्दींचें वैभव अन्य नाहीं दुजें ।
एका केशवराजें सकळ सिध्दी ।।२।।

ऋध्दि-सिध्दी निधी अवधीच उपाधि।
जंव त्या परमानंदी मन नाहीं ।।३।।

ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान ।
हरीचें चिंतन सर्वकाळ ।।४।।

१४- नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी ।
कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।१।।

रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप ।
पापाचें कळप पळती पुढें ।।२।।

हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा ।
म्हणती जे वाचा तया मोक्ष ।।३।।

ज्ञानदेवा पाठ नारायण नाम ।
पाविजे उत्तम निजस्थान ।।४।।

१५- एक नाम हरि द्वैत नाम दुरी ।
अद्वैत कुसरी विरळा जाणें ।।१।।

समबुध्दि घेता समान श्रीहरि ।
शम दमा वैरी हरि झाला ।।२।।

सर्वांघटी राम देहादेहीं एक ।
सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मीं ।।३।।

ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा ।
मागिलिया जन्मा मुक्त झालों ।।४।।

१६- हरिनाम जपे तो नर दुर्लभ ।
वाचेसि सुलभ रामकृष्ण ।।१।।

रामकृष्ण नामीं उन्मनी साधिली ।
तयासी लाधली सकळ सिद्धि ।।२।।

सिध्दि बुध्दि धर्म हरिपाठी आले ।
प्रपंची निवाले साधुसंगें ।।३।।

ज्ञानदेवी नाम रामकृष्ण ठसा ।
येणें दशदिशा आत्माराम ।।४।।

१७- हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय ।
पवित्रचि होय देह त्याचा ।।१।।

तपाचे सामर्थ्यें तपिन्नला अमूप ।
चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ।।२।।

मातृ, पितृ, भ्राता, सगोत्र अपार ।
चतुर्भुज नर होऊनि ठेले ।।३।।

ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें ।
निवृत्तीनें दिधलें माझ्या हातीं ।।४।।

१८- हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन ।
हरिवीण सौजन्य नेणे कांहीं ।।१।।
तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें ।
सकळही घडलें तीर्थाटन ।।२।।
मनोमार्गें गेला तो येथे मुकला ।
हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ।।३।।
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी ।
रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ।।४।।

**भजन :।।जय जय विठोबा रखुमाई।।जय जय विठोबा रखुमाई।।**

१९- नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।
पापें अनंत कोटी गेली त्यांचीं ।।१।।

अनंत जन्मांचें तप एक नाम ।
सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।२।।

योग - याग क्रिया धर्माधर्म माया ।
गेले ते विलया हरिपाठीं ।।३।।

ज्ञानदेवीं यज्ञ - याग क्रिया धर्म ।
हरिवीण नेम नाहीं दुजा ।।४।।

२०- वेदशास्त्र प्रमाण श्रृतीचें वचन ।
एक नारायण सार जप ।।१।।

जप, तप, कर्म, हरिवीण धर्म ।
वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ।।२।।

हरिपाठी गेलें ते निवांतचि ठेले ।
भ्रमर गुंतले सुमनकळिके ।।३।।

ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र ।
यमें कुळगोत्र वर्जियेलें ।।४।।

२१- काळवेळ नाम उच्चारितां नाहीं ।
दोन्ही पक्ष पाहीं उध्दरती ।।१।।

रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण ।
जडजीवां तारण हरि एक ।।२।।

हरि नाम सार जिव्हा या नामाची ।
उपमा त्या दैवाची कोण वानी ।।३।।

ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ ।
पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ।।४।।

२२- नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ ।
लक्ष्मीवल्लभ तया जवळी ।।१।।

नारायण हरि, नारायण हरि ।
भुक्ति, मुक्ति चारी घरीं त्यांच्या ।।२।।

हरिवीण जन्म तो नर्कचि पैं जाणा ।
यमाचा पाहुणा प्राणी होय ।।३।।

ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड ।
गगनाहूनि वाड नाम आहे ।।४।।

२३- सात, पांच, तीन दशकांचा मेळा ।
एकतत्त्वीं कळा दावी हरि ।।१।।

तैसें नव्हे नाम सर्व मार्गा वरिष्ठ ।
तेथें कांही कष्ट न लगती ।।२।।

अजपा जपणें उलट प्राणाचा ।
तेथें ही मनाचा निर्धारु असे ।।३।।

ज्ञानदेवा जिणें नामेंवीण व्यर्थ ।
रामकृष्णीं पंथ क्रमीयेला ।।४।।

२४- जप, तप, कर्म, क्रिया नेम धर्म ।
सर्वांघटीं राम भावशुद्ध ।

न सोडी रे भावो, टाकी रे संदेहो ।
रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ॥२॥

जात, वित्त, गोत, कुळशीळ मात ।
भजे कां त्वरित भावनायुक्त ॥३॥

ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ।
वैकुंठभुवनीं घर केलें ॥४॥

२५- जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं ।
हरिउच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ।।१।।

नारायण हरि उच्चार नामाचा ।
तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ।।२।।

तेथील प्रमाण नेणवे वेदांसी ।
ते जीव-जंतूसी केवीं कळे ।।३।।

ज्ञानदेवा फळ नारायण पाठ ।
सर्वत्र वैकुंठ केलें असें ।।४।।

२६- एकतत्त्व नाम दृढ धरीं मना ।
हरिसी करुणा येईल तुझी ।।१।।

तें नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद ।
वाचेसी सद्‌गद् जपें आधीं ।।२।।

नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा ।
वायां आणिक पंथा जासी झणी ।।३।।

ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी ।
धरोनि श्रीहरि जपें सदां ।।४।।

२७- सर्वसुख गोडी साही शास्त्रें निवडी ।
रिकामा अर्धघडी राहूं नको ।।१।।

लटिका व्यवहार सर्व हा संसार ।
वायां येरझार हरिवीण ।।२।।

नाम मंत्र जप कोटी जाईल पाप ।
कृष्णनामीं संकल्प धरुनि राहे ।।३।।

निजवृत्ति काढीं सर्व माया तोडी ।
इंद्रियां सवडी लपूं नको ।।४।।

तीर्थव्रतीं भाव धरी रे करुणा ।
शांति दया पाहुणा हरि करीं ।।५।।

ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान ।
समाधि संजीवन हरिपाठ ।।६।।

२८- अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस ।
रचिले विश्वासे ज्ञानदेवें ।।१।।

नित्य पाठ करी इंद्रायणीतीरी ।
होय अधिकारी सर्वथा तो ।।२।।

असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मन ।
उल्हासें करुन स्मरण जीवीं ।।३।।

अंतकाळी तैसा संकटाचें वेळी ।
हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य ।।४।।

संत सज्जनांनी घेतली प्रचीती ।
आळसी मंदमतिं केवीं तरे ।।५।।

श्रीगुरु - निवृत्ति वचन प्रेमळ ।
तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।

**।। पुंडलिक वरदा हरि विठ्ठल ।।**




।। श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी, आळंदी ।।

अ) नामसंकीर्तन साधन पैं सोपे ।
जळतील पापें जन्मांतरे ।।१।।

न लगती सायास जावें वनांतरा ।
सुखें येतों घरा नारायण ।।२।।

ठायीच बैसोन करा एकचित्त ।
आवडी अनंत आळवावा ।।३।।

रामकृष्णहरि विठ्ठल, केशवा ।
मंत्र हा जपावा सर्वकाळ ।।४।।

याविण आणिक असतां साधन ।
वाहातसें आण विठोबाची ।।५।।

तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनि ।
शहाणा तो धणी घेतो येथें ।।६।।

टीप : येथे पुन्हा देवाचिये द्वारी - हा अभंग म्हणावा. तो पान क्र. ११ वर छापला आहे. हरिपाठांतील हा प्रथम अभंग घेऊन ।। **ज्ञानोबा माऊली तुकाराम** ।। हे भजन गावे. त्यानंतर गुरुपरंपरेचे अभंग सुरु करावेत.

## ब) गुरुपरंपरेचे अभंग

१. सत्य गुरुरायें कृपा मज केली ।
परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥

सांपडविले वाटे जातां गंगास्नाना ।
मस्तकीं जाणा ठेविला कर ॥२॥

भोजना मागती तूप पावशेर ।
पडिला विसर स्वप्नामाजीं ॥३॥

काय कळें उपजला अंतराय ।
म्हणोनियां काय त्वरा झाली ॥४॥

राघव - चैतन्य - केशव - चैतन्य ।
सांगितली खूण मालिकेची ।।५।।

बाबाजीं आपुलें सांगितलें नाम ।
मंत्र दिला रामकृष्णहरी ।।६।।

माघ शुद्ध दशमी पाहूनि गुरुवार ।
केला अंगीकार तुका म्हणें ।।७।।

२. माझियें मनींचा जाणोनियां भाव ।
तो करी उपावों गुरुरावो ।।१।।

आवडीचा मंत्र सांगितला सोपा ।
जेणें नोहे गुंफा काहीं कोठें ।।२।।

जाती पुढें एक उतरले पार ।
हा भवसागर साधुसंत ॥३॥

जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी ।
उतार सांगंडी तापे पेटे ॥४॥

तुका म्हणे संती दावियेला तारु ।
कृपेचा सागरु पांडुरंग ॥५॥

३- घालूनियां भार राहिलों निश्चिंती ।
निरविले संती विठोबासी ॥१॥

लावूनिया हात कुरुवाळिला माथां।
सांगितले चिंता न करावी ।।२।।

कटीं कर सम चरण साजिरें ।
राहिला भिवरेतिरीं उभा ।।३।।

खुंटले सायास आणीक या जीवा ।
धरिले केशवा पाय तुझें ।।४।।

तुज वाटे आता तें करी अनंता।
तुका म्हणे संतां लाज माझी ।।५।।

४- माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव।
आपणचि देव होय गुरू ।।१।।
पढियें देहभाव पुरवी वासना ।
अंती तें आपणांपाशी न्यावें ।।२।।
मागें - पुढें उभा राहे सांभाळीत ।
आलिया आघात निवाराया ।।३।।
योगक्षेम त्यांचें जाणें जडभारी ।
वाट दावी करीं धरुनियां ।।४।।
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं ।
पहावे पुराणीं विचारुनी ।।५।।

५- आदिनाथ उमा बीज प्रगटिलें ।
मछिंद्रा लाधलें सहज स्थिती ।।१।।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली ।
पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ।।२।।
वैराग्यें तापला सप्रेमे निवाला ।
ठेवा जो लाधला शांतिसुख ।।३।।
निर्द्वंद्व नि:शंक विचरतां मही ।
सुखानंद ह्रदयीं स्थिरावला ।।४।।
विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख ।
येऊनि सम्यक अनन्यता ।।५।।

निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण ।।
कुळ हें पावन कृष्णनामें ।।६।।

६- आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ।
मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।१।।
मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला ।
गोरक्ष वोळला गहिनीप्रती ।।२।।
गहिनी प्रसादें निवृत्ती दातार ।
ज्ञानदेवा सार चोजविलें ।।३।।

७ - श्री गुरु सारिखा असता पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण करी ।।१।।

राजयाची कांता काय भीक मागे।
मनाचिया जोगे सिद्धी पावे ।।२।।

कल्पतरु तळी जो कोणी बैसला ।
काय वाणू त्याला सांगा जो जी ।।३।।

ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो ।
आता उध्दरिलो श्री गुरुकृपे ।।४।।

८ - ज्ञानियांचा राजा गुरु महाराव ।
म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसे ।।१।।

मज पामरा हें काय थोरपण ।
पायींची वाहाण पायीं बरी ।।२।।

ब्रह्मादिक जेथें तुम्हां वोळगणें ।
इतर तुळणें काय पुढें ।।३।।

तुका म्हणें नेणें युक्तीची ते खोली ।
म्हणोनी ठेविली पायी डोई ।।४।।

९- अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आंता ।
चरणी जगन्नाथा चित्त ठेलें ॥१॥

माय जगन्नाथ बाप जगन्नाथ ।
अनाथाचा नाथ जनार्दन ॥२॥

एका जनार्दनी एकपणे उभा ।
चैतन्याची शोभा शोभतसे ॥३॥

१०- अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदे भरीन तिन्ही लोक ।।१।।

जाईन गे माये तयां पंढरपूरा ।
भेटेन माहेरा आपुलियां ।।२।।

सर्व सुकृतांचे फळ मी लाहीन ।
क्षेम मी देईन पांडुरंगा ।।३।।

बाप रखुमादेवीवरु श्रीविठ्ठलाची भेटी।
आपुले संवसाटी करुनि ठेला ।।४।।

**भजनः श्री ज्ञानेश्वर माऊली। श्री ज्ञानराज माऊली तुकाराम।।**

## क) विनवणीचे अभंग

१) कृपाळु सज्जन तुम्ही संतजन ।
हेंचि कृपादान तुमचें मज ॥१॥

आठवण तुम्हीं द्यावी पांडुरंगा ।
कींव माझी सांगा काकुळती ॥२॥

अनाथ अपराधी पतित आगळा ।
परि पायां वेगळा नका करुं ॥३॥

तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी ।
मग मज हरि उपेक्षीना ॥४॥

२) हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।
नलगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ।।३।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी ।।४।।

**भजन : ।। जय जय विठ्ठल जय जय जय विठ्ठल ।।**

३) बोलिली लेकुरे । वेडी वांकुडी उत्तरे ।।१।।
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिध्द ।।२।।
नाही विचारिला । अधिकार म्यां आपुला ।।३।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पाया पै किंकरा ।।४।।

**भजन : ज्ञानदेव तुकाराम । ज्ञानदेव तुकाराम ।।**

४) झाले समाधान । तुमचे धरिलें चरण ।।१।।
आतां उठावेंसें मना । येत नाहीं नारायणा ।।२।।
सुरवाडिकपणे । येथे सांपडलें केणे ।।३।।
तुका म्हणे भोग। गेला निवारिला लाग ।।४।।

५) करुनि आरती । आतां ओवाळूं श्रीपती ।।१।।
आजी पुरलें नवस। धन्य काळ हा दिवस ।।२।।
पाहा वो सकळां । पुण्यवंता तुम्ही बाळा ।।३।।
तुका वाहे टाळी। होता सन्निध जवळीं ।।४।।

६) प्रेम सप्रेम आरती ।
गोविंदाते ओंवाळिती ।।१।।

धन्य धन्य तें लोचन ।
नित्य करिती अवलोकन ।।२।।

बाळा प्रौढा आणि मुग्धा ।
ओंवाळिती परमानंदा ।।३।।

नामा म्हणें केशवा ते ।
देखुनी राहिलो तटस्थे ।।४।।

## ड) **आरती** (हरिपाठ संपल्यानंतर)

## १) आरती : भगवान पांडुरंगाची

(सूचना - महाराष्ट्रा मध्ये भगवान श्री पांडुरंगाची आरती आप आपल्या परिपाठा प्रमाणे तीन किंवा चार किंवा पाच कडव्यांची म्हटली जाते. आम्ही इथे पूर्ण आरती देत आहोत. आपण आपल्या आवडी प्रमाणे आरती म्हणावी!)

युगे अठ्ठाविस विटेवरी उभा ।<br>
वामांगीं रखुमाई दिसे दिव्यशोभा ।<br>
पुंडलिकाचें भेटी परब्रह्म आलें गा ।<br>
चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ।।१।।

जय देव, जय देव, जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा, राहीच्या वल्लभा पावें जीवलगा ।।धृ।।
तुळसीमाळा गळां कर ठेवून कटीं ।
कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी ।।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ।।२।।
धन्य वेणू नाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राही रखुमाई राणीया सकळा ।
ओंवाळीती राजा विठोबा सावळा ।।३।।

ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती ।
चंद्रभागे माजी सोडुनियां देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।४।।

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमाजीं स्नानें जें करिती ।
दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ति ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिति ।।५।।

जयदेव, जयदेव, जय पांडुरंगा ।।धृ ।।

## २) आरती : श्री संत ज्ञानदेव महाराजांची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।।१।।
आरती ज्ञानराजा ।।धृ।।

लोपलें ज्ञानजगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नांव ठेविलें ज्ञानीं ।।२।।
आरती ज्ञानराजा ।।धृ।।

प्रगट गुह्य बोलें । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनीं । पायीं टकचि ठेलें ।।३।।
आरती ज्ञानराजा ।।धृ।।

### ३) आरती : श्री संत तुकाराम महाराजांची

आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरु धामा ।
सच्चिदानंद मूर्ति। पाय दाखवी आम्हां ।।१।।
आरती तुकारामा ।।धृ।।

राघवें सागरांत । पाषाण तारियेलें ।
तैसें या तुकोबाने। अभंग रक्षियेलें ।।२।।
आरती तुकारामा ।।धृ।।

तुकितां तुलणेसी । ब्रह्म तुकासी आले ।
म्हणोनि रामेश्वरें। चरणीं मस्तक ठेविलें।।३।।
आरती तुकारामा ।।धृ।।

## ४) आरती : श्री एकनाथा महाराजांची

आरती एकनाथा । महाराजा समर्था ।
त्रिभुवनीं तूंचि थोर । जगद्‌गुरु जगन्नाथा ।।धृ।।

एकानाथ नामसार । वेदशास्त्रांचे गुज ।
संसार दुःख नाशे । महामंत्राचे बीज ।
आरती एकनाथा ।।१।।

एकनाथ नाम घेतां । सुखवाटलें चित्ता ।
अनंत गोपाळदासा । धणी न पुरे गुण गाता ।
आरती एकनाथा ।।२।।

## ५) धुप आरती

सच्चिद् आनंदा, आत्मारामा, सुखकंदा ।
जयदेवा! जय ब्रह्मस्वरुपा! श्रीसद्गुरुनाथा ।।
आरती ओवाळुनि तवचरणी, ठेवितसे माथा ।।धृ.।।

चंद्रमंडलांतर्गत निर्मळ, ब्रह्मरंध्र भुवनी ।
एकविस स्वर्गावरती आसन, साजे कुंजवनी ।।१।।

सहस्त्रदल पंकजी विराजित, गुंफे माझारी ।
अतसि कुसुमसम कांति झळके,शुक्लांबरधारी।।२।।

षडचक्रांचे देव वंदिले, तीर्थाटन झाले ।
द्विदल पंढरपुरी सद्गुरु, पाहुनि मन धाले ।।३।।

सद्रूप चिद्रूप आनंदात्मा, सज्जन दीनबंधू ।
करुणासागर, पूर्ण उजागर, तारक भवसिंधू ।।४।।

प्राणापाने सोऽहं सूत्रे, काया-वाणी-मने ।
त्रिगुण ताटी प्रसाद अर्पण, केलासे सुमने ।।५।।

रत्नजडित-सिंहासन लखलख, रंग रंग भरिले ।
चिन्मय मूर्ति ध्यान गुरुचे, सोज्वळ मनि धरिले ।।६।।

श्रवण-पठन या प्रदक्षिणेने, गुरुवरदेश्वरिला ।
निजध्यासिता ज्ञानदीपाचा, प्रकाश संचरला ।।७।।

अनहद्, वेणू, शंख, झांजरी, घागरिया वाजे।
मृदंग-वीणा-टाळ-नगारा, गगनांबरी गाजे ।।८।।

गीता-मंत्र-पुष्पांजलि वाहू, गुरुपद अरविंदा ।
प्रसाद-तीर्था 'सिंघ' सेवुनि, पावे आनंदा ।।९।।

(रचियेता : श्रीझामसिंघ महाराज,आर्वी)

## ६) श्री समर्थ लहानुजी महाराजांची आरती

(ध्वनी - आरती करो हरिहरकी)

आरती करो संतनकी, लहानुजी गुरुकी ।
प्यारे भगवनकी । आरती करो संतनकी ।।टेक।।
निकला सूरज पूर्व दिशामे । वैसे आये भांडे कुलमें ।
करके लीला विचित्र जगमें।शिव मूर्ति है प्रभुकी ।।१।।
पंचतत्वका शाल दुशाला।चाँद सूरजका है उजियाला।
सोऽहं की चलती है माला । रात दिन जीवनकी ।।२।।

विदेह जिनकी मस्त स्थिती है। अंतर्मुखमें सदा मगन है।
अजानूबाहू पद्मांकुश है । अलक्षमुद्रा जिनकी ।।३।।

आडकुजी है तुम्हे सहारे । दीन दुःखीयोको तुने उद्धारे।
शुक्लाम्बर है वस्त्र तुम्हारा। चिन्मय झाँकी जिनकी ।।४।।

इच्छित फल भक्तोने पाया। कितनो को भव पार लगाया।
बरखा कर दो शांति सुखोकी । होली दरिद्रताकी ।।५।।

भक्त काम कल्पद्रूम स्वामी । सहजासन में ब्रह्म पछानी ।
'दास' तुम्हारा कुछ ना मांगे । आशा है दर्शनकी ।।६।।

(श्री. रा. मो. बेलूरकर, ग्रामगीताचार्य)

## ७) आरती : श्री संत सत्यदेव बाबांकी
(तर्ज- आरती जय जगदीश्वरकी)

आरती सत्यदेव बाबा की । दयाधन ब्रह्मस्वरुपजी की ।।धृ।।
तुम्ही हो सत्यस्वरुप का ज्ञान । सदा स्वानंद मस्त है ध्यान।
वृत्ति है निर्वीकल्प विज्ञान । तुम्ही हो आतम ज्योतिमहान।
तर्ज-नशिले नयन झरे दिनरात। प्रेमकी सदा चले बरसात।।
**बताकर सार । दिया आधार । किया भवपार ।।**
बहायीसुखाधार निजकी।दयाधनब्रहमस्वरुपजीकी।।१।।
सत्यही ईश्वर का है सार । विश्व को सत्य काही आधार।
तुम्ही हो दया शांति भांडार। किया है भक्तों का उध्दार।

तर्ज- लगाते सहजासन चटमे । निरंजन माल चले घटमे ।।
मुखमे गुरुनाम । रहते गुरुधाम । वृत्ती निष्काम ।।
वाणी है अमरसत्य जीनकी। दयाधन ब्रहमस्वरुपजीकी।।२।।

सत्य-लहानुजी-तुकड्यादास। ब्रह्मरुप आडकुजीका ध्यास।
आरती करता हूँ यह दास । पंच प्राणोका दीप-परकास।
तर्ज- चिन्मय रुप पियारा है। तुम्हारा नाम उजारा है ।।
चरण के पास । रहे यह 'दास'। सदा यही आस ।
अर्जी है देवकीनंदनकी । दयाधन ब्रह्मस्वरुपजीकी ।।३।।
आरती सत्यदेवबाबा की। दयाधन ब्रह्मस्वरुपजी की ।।धृ।।

## ८) आरती : श्री संत शंकरबाबा महाराजांची

आरती शंकरबाबा । दिव्य स्वरुपाची प्रभा ।।
दिपविले नवखंड । प्रकाशली सारी आभा ।।धृ.।।

पंचप्राण ओवाळीता । नुरले द्वैत भाव चित्ता ।।
अखंड ध्यास तुझा । कोणी न होय परता ।।१।।

ध्यानी-ध्याता साक्षी माझा। तूची देही विदेही ।।
नादबिंदू जागवोनीया । तुझे अंतरंग पाही ।।२।।

चिन्मय रुप तुझे । ध्यानी दर्शन दावीले ।।
जागविले मजलागी । दावी कृपेची पाऊले ।।३।।

अनुभवी गुरु माझा । मन एकांताशी बोले ।
अंतरंगी पाही आता । स्वानंदाची पाऊले ।।४।।
सोहं मंत्र जागविता । अनुभव सिध्द झाले ।
गुरु शिष्य एक भेटी । जीव शिव ऐक्य झाले ।।५।।
साक्षात्कार तयापूढे । ध्यानी - मनी आदिरुपा ।
ज्योतिची निजज्योति । साक्ष साक्षी ब्रह्मरुपा ।।६।।
अनुभवी गुरू ऐसा । जगी जागवे स्वरुपा ।
दास म्हणेयाची छंदे।चुकवी चौऱ्यांशीच्या खेपा।।७।।
आरती शंकर बाबा । दिव्य स्वरुपाची प्रभा ।।
दिपविले नवखंड । प्रकाशली सारी आभा ।।धृ.।।

## उपसंहार (नाट) विभाग

१) घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रुप तुझे ।
प्रेमे आलिंगीन, आनंदे पूजीन ।
भावे ओवाळीन म्हणे नामा ।।१।।

२) भजन - विठ्ठल रखुमाई, विठोबा रखुमाई

३) **नाटाचा अभंग प्रार्थना :**
श्री अनंता मधुसूदना । पद्मनाभा, नारायणा ।
जगद्व्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ।।१।।

सकळ देवाधिदेवा । कृपाळुवा जी केशवा ।
महानंदा महानुभवा । सदाशिवा सहजरुपा ।।२।।
चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा ।
सहस्त्रपादा सहस्त्रकरा ।क्षीरसागरा शेषशयना ।।३।।
कमल नयना कमलापति । कामिनी मोहना मदनमूर्ति ।
भवतारका धरित्याक्षिती। वामनमूर्ति त्रिविक्रमा।।४।।
अगा ये सगुणा-निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना ।
वसुदेव देवकीनंदना। बाळरांगणा, बाळकृष्णा ।।५।।
तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावा जी चरणीं ।
हेचि करितसे विनवणी । भवबंधनीं सोडवावें ।।६।।

## ४) मागणे :

अ) हेचि व्हावे माझी आस । जन्मोजन्मी तुझा दास।।१।।
पंढरीचा वारकरी । वारी चुको नेदी हरि ।।२।।
संतसंग सर्व काळ। अखंड प्रेमाचा कल्लोळ ।।३।।
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान ।।४।।

ब) आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासा ।।१।।
कल्पनेची बाधा न हो कवणे काळी ।
ही संत मंडळी सुखी असो ।।२।।

अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझिया विष्णुदासां भाविकांसी ।।३।।

नामा म्हणे तयां असावें कल्याण ।
ज्या मुखीं निधान पांडुरंग ।।४।।

क) मागणे ते एक तुजप्रती आहे ।
देशील तरी पाहे पांडुरंगा ।।१।।

या संतासी निरवी हेचि मज देई ।
आणिक दुजे कांही न मागो देवा ।।२।।

तुका म्हणे आतां उदार तूं होई ।
मज ठेवी पायीं संताचिया ।।३।।

ड) भजन - ।। ज्ञानदेव तुकाराम ।।

५) प्रसाद

अ) पाहे प्रसादाची वाट । द्यावें धुवोनियां ताट ।।१।।
शेष घेऊनि जाईन । तुमचे झालिया भोजन ।।२।।
झालों एक सवा । तुम्हा आळवोनी देवा ।।३।।
तुका म्हणे चित्त । करुनि राहिलों निवांत ।।४।।

ब) भजन : जय जय विठ्ठल । जय जय विठ्ठल ।।

क) पावला प्रसाद आता विठो निजावे ।
आपुलाले श्रम कळो येताती भावे ।।१।।

आता स्वामी सुखे निद्रा करा गोपाळा ।
पुरले मनोरथ जातो आपुलिया स्थळा ।।२।।

तुम्हांसी जागवू आम्ही आपुलिया चाडा ।
शुभाशुभ कर्मे दोष हरावया पीडा ।।३।।

तुका म्हणे दिलें उच्छिटाचें भोजन ।
नाहीं निवडिलें आम्हा आपणा भिन्न ।।४।।

### क) पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परें पडों । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।।४।।

चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव।
बोलते जें अर्णव । पीयूषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जें तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरें होतु ।।६।।
किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।

इस देव में भी देव है ।
जो देव का परदेव है ।
अती सुक्ष्म से भी सुक्ष्मतर ।
वह मुलदेव सदैव है ।।१।।

जहाँ तक है साक्षी साक्ष का ।
द्रष्टा सहित त्रिपुटी महा ।
यह सब जहाँ पर है विलय ।
'सत्यदेव' उसको क्ही कहाँ ।।२।।

सदायोग हा संतसेवा घडावा ।
सदा देह माझा संत कार्यी पडावा ।
नको दूर लोटू तू बापा दयाळा ।
नमस्कार माझा श्री लहानुजी घननिळा ।।१।।

हरि ॐ
पूर्णमदः पूर्ण मिदं पूर्णात्, पूर्ण मुदच्यते,
पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्ण मेवा वशिष्यते ।
ॐ शांतिः शांतिःशांतिः

## जयघोष

पुंडलिक वरदे हरि विठ्ठल ।

श्री ज्ञानदेव, तुकाराम, दत्तात्रय, जनार्दन,

श्री एकनाथ महाराजकी जय ।

श्री पांडुरंग भगवान की जय ।

माऊली ज्ञानेश्वर महाराज की जय ।

जगतगुरु तुकाराम महाराज की जय ।

श्री समर्थ मायबाई महाराज की जय ।

श्री समर्थ आडकुजी महाराज की जय ।

श्री समर्थ लहानुजी महाराज की जय ।
श्री समर्थ सत्यदेव बाबा महाराज की जय।
वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जय ।
श्री संत बुधाजी महाराज की जय ।
श्री संत भागिरथा माता की जय ।
श्री समर्थ शंकरबाबा महाराज की जय ।
सब संतन की जय ।
भारत माता की जय ।

# नाटाचा अभंग विभाग

## सोमवारचा नाटाचा अभंग

बरवा झाला वेवसाव । पावलो चिंतिलाचि ठाव ।
दृढपायीं राहीला भाव । पावला जीव विश्रांती ।।१।।
बरवा फळला शकुन । अवघा निवारिला सीण ।
तुमचें झालिया दरूषण । जन्ममरण नाहीं आतां ।।२।।
बरवें झालें आलों या ठाया । होते संचित ठायींचे पाया।
देहभाव पालटली काया । पडली छाया ब्रह्मींची ।।३।।
जोडिले हें न सरे धन । अविनाश आनंद घन ।
अमूर्तमूर्ति मधुसूदन । समचरणीं देखियला ।।४।।

जुनाट जुगादिचे नाणें । बहुता काळाचें ठेवणें ।
लोपलें होतें पारिखेपणें । ठाव चळणें चुकविला ।।५।।
आतां या जीवाचियासाठीं । न सोडीं पडलियां मिठी ।
तुका म्हणे सीणलों जगजेठी। न लवीं दिठी दुसऱ्याची ।।६।।

## मंगळवारचा नाटाचा अभंग

सेंदरी हेंदरी दैवतें । कोण तीं पूजी भूतेंखेतें।
आपुल्या पोटा जी रडतें । मागती शितें अवदान ।।१।।
आपुलें इच्छे आणिकां पीडी । काय ते देईल बराडी ।
कळोंहीआली तयाची जोडी।अल्प रोकडी बुद्धि अधिरा।।२।।

दासीचा पाहुणेर उखीतें । धणी देईल आपुल्या हातें ।
करुणा भाषण उचितें । हें तों रितें सतत शक्तिहीन ।।३।।

काय तें थिल्लरीचें पाणी । ओठ न भिजे न फिटे धणी ।
सीण तरी आर्दी अवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ।।४।।

विलेपने बुजविती तोंड । भार खोळ वाहाती उदंड ।
करविती आपआपणया दंड।ऐसियास भांड म्हणे देव तो।।५।।

तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन ।
तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदूं चरण येती सकळ ।।६।।

## बुधवारचा नाटाचा अभंग

विठ्ठल आमचें जीवन । आगम निगमाचे स्थान ।
विठ्ठल सिध्दीचे साधन । विठ्ठल ध्यान विसावा ।।१।।

विठ्ठल कुळींचे दैवत । विठ्ठल वित्त, गोत, चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरूषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ।।२।।

विठ्ठल विस्तारला जनीं । सप्तही पाताळें भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं । विठ्ठल मुनि मानसी ।।३।।

विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा ।लावियला चाळा विश्व विठ्ठले ।।४।।

विठ्ठल बाप, माय, चुलता । विठ्ठल भगिनी आणि भ्राता ।
विठ्ठलेवीण चाड नाहीं गोता । तुका म्हणे आतां नाहीं दुसरें ।।५।।

## गुरुवारचा नाटाचा अभंग

अलक्ष अगोचर गोसावी । अलक्ष झाले सहज भावी ।
अलक्षा लागलिसे दिवी । त्या निरंजनाची ।।१।।

त्या निरंजनाचा प्रकाशु । शिव झाला तृतिय अंशु ।
शिवा पासुनि प्रकाशु । त्या चैतन्याचा ।।२।।

त्या चैन्याचे उदरी । एक पुरुष जन्मला निराधारी ।
त्या पुरुषा पासाव सुंदरी । मुळमाया ते ।।३।।

त्या मुळ मायेच्या पोटी।ओंकार जन्मला शेवटी।
त्या ओंकारा पासाव धुर्जटी। महारुद्र तो झाला ।।४।।

त्या महारुद्राच्या तेजी । विष्णू जन्मला सहजी ।
त्या विष्णू कमला माजि।आला तो विधाता ।।५।।

त्या विधात्या पासुनि जाणा। हे पिंड ब्रह्मांड रचना।
ऐशा सांगितल्या खुणा। श्री निवृत्ती नाथे ।।६।।

## शुक्रवारचा नाटाचा अभंग

शुकवारचा नाटाचा अभंग पृष्ठ क्र. ७५ वर दिला आहे.

## शनिवारचा नाटाचा अभंग

आतां मज धरवावी शुद्धि । येथूनी परतवावी बुद्धि ।
घ्यावें सोडवूनी कृपानिधि। सांपडलो संधी काळचक्रीं।।१।।

करिसील तरी नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई ।
आपुले करुणेची साई । करीं वो आई मजवरी ।।२।।

मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें ।
नेणे आयुष्य होतें उर्णे । पुढील पेणें अंतरलो ।।३।।

आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय ।
येथें म्यां येउनी केले काय। नाहीं तुझे पाय आठविले ।।४।।

करूनी अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा ।
आपुले नामी द्यावा प्रेमा । सोडवी भ्रमापासूनियां ।।५।।

हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपे चरणीं ।
करू हा रस सेवन वाणी । फिटे तो धणी तुका म्हणे ।।६।।

## रविवारचा नाटाचा अभंग

अगा ए सांवळ्या सगुणा । गुणनिधिनाम नारायणा ।
आमची परिसावी विज्ञापना। सांभाळीं दीना आपुलिया ।।१।।

बहु या उदराचे कष्ट । आम्हांसी केले कर्मभ्रष्ट ।
तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्त्यें ।।२।।
झालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी ।
न कळे कधीं सोडविसी । दृढपाशीं बहू बांधलों ।।३।।
येथें तो नये आठव काहीं। विसावा तो क्षण एक नाहीं।
पडिलो आणिके प्रवाहीं । हित तो कांहीं दिसेचि ना ।।४।।
जीवित्व वेचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें ।
कांहीं व्याधि, पीडा, रोगें । केलिया भोगें तडातोडी ।।५।।
माझा मीच झालो शत्रु। कैंचे पुत्र, दारां, कैंचा मित्रु ।
कासया घातला पसरु । अहो जगदगुरू तुका म्हणे ।।६।।

## क्षीरापतीचे अभंग विभाग

क्षीरसागरीचें नावडे सुख ।
क्षीरापती देखे देव आला ।।१।।

कवळ कवळ पाहा हो ।
मुख पसरुनि धावतो देवो ।।२।।

एकादशी देव जागरा आला ।
क्षीरापती लागीं टोकत ठेला ।।३।।

द्वादशी क्षीरापती ऐकोनि गोष्टी ।
आवडी देव देतसे मिठी ।।४।।

क्षीरापती घालितां वैष्णवामुखीं ।
तेणें मुखें देव होतसे सुखीं ।।५।।

क्षीरापती सेविता आनंदु ।
स्वानंदे भुलला नाचे गोविंदु ।।६।।

क्षीरापती सेविता वैष्णवा लाहो ।
मुखा माजीं मुख घालितो देवो ।।७।।

क्षीरापती चारा जदार्दन मुखीं ।
एका एकीं तेणें होतसे सुखी ।।८।।

|| तुकाराम तुकाराम तुकाराम तुकाराम ||

|| पुंडलिक हरि वरदा हरि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम ||

|| सद्‌गुरु शंकरबाबा महाराज की जय ||



